तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, १७ सप्टेंबर २०२५

आतील पानावर
पान २– अहान शेट्टीला लागली लॉटरी
पान ३ – इब्राहिमला डेट करतेय पलक?
पान ४ – रश्मिका मंदानाने घातली डायमंड रिंग
पान ५ – बॉर्डर २ सिनेमात नवी अभिनेत्री
पान ६ – मी कोणाचं करिअर संपवलं?





# 'आवारापन २'मध्ये इमरानसोबत दिशा झळकणार



इमरान हाश्मीच्या 'आवारापन २' या आगामी चित्रपटाची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. आता या चित्रपटातील कलाकारांबद्दल एक मोठी बातमी समोर येत आहे. बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्रीला 'आवारापन २'मध्ये भूमिका मिळाल्याची चर्चा आहे. या वर्षी घोषित झालेल्या मोठ्या चित्रपटांबद्दल बोलायचं झाल्यास, त्यात इमरान हाश्मीच्या 'आवारापन २' चित्रपटाचं नाव नक्कीच येईल. २००७ साली आलेल्या 'आवारापन'च्या या सीक्वेलसाठी चाहत्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. घोषणा झाल्यापासून हा चित्रपट चर्चेत आहे. आता असं वृत्त समोर आलं आहे की 'आवारापन २' मध्ये बॉलिवूड अभिनेत्रीची एन्ट्री झाली आहे, जी पडद्यावर इमरान हाश्मीसोबत रोमान्स करताना दिसेल. रिपोर्टनुसार, दिग्दर्शक विक्रम भट यांच्या या चित्रपटासाठी दिशा पटानीला मुख्य अभिनेत्री म्हणून निवडण्यात आलं आहे. होय, 'आवारापन' च्या सीक्वलमध्ये दिशा इम्रान हाश्मीसोबत रोमान्स करताना दिसेल. लवकरच निर्माते याबद्दल अधिकृत घोषणा करतील अशी अपेक्षा आहे. ही बातमी समोर आल्यानंतर 'आवारापन २' साठी चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे. इमरान आणि दिशा पटानी पहिल्यांदाच एकत्र पडद्यावर दिसणार आहेत. २००७ मध्ये आलेल्या 'आवारापन' मध्ये श्रिया सरन आणि मृणालिनी शर्मा यांनी मुख्य भूमिका साकारल्या होत्या. या वर्षी मार्च महिन्यात एका प्रमोशनल व्हिडिओद्वारे इम्रान हाश्मीने जाहीर केलं होतं की १९ वर्षांनंतर 'आवारापन' पुन्हा थिएटरमध्ये परत येईल. याची रिलीज डेट पाहता, ३ एप्रिल २०२६ रोजी 'आवारापन' चा सिक्वेल थिएटरमध्ये प्रदर्शित होईल.

# ललित प्रभाकरची बॉलिवूडमध्ये एन्ट्री



मराठी अभिनेता ललित प्रभाकरला 'जुळून येती रेशीमगाठी' या मालिकेमुळे मोठी लोकप्रियता मिळाली. या मालिकेनंतर तो काही मराठी चित्रपटांमध्ये देखील पाहायला मिळाला. नुकताच तो 'आरपार' चित्रपटामुळे चर्चेत आला आहे. यात तो अभिनेत्री हृता दुर्गुळेसोबत झळकला. यानंतर आता ललित प्रभाकरची बॉलिवूडमध्ये एन्ट्री होणार आहे. याआधी ललित इमरान हाश्मीच्या 'ग्राउंड झिरो' चित्रपटात झळकला होता. यानंतर आता ललित 'वन टू चा चा चा' या हिंदी चित्रपटात पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन अभिषेक राज आणि रजनीश ठाकूर यांनी केली असून साजन गुप्ता, विजय लालवानी आणि नताशा सेठी यांनी निर्मिती केली आहे. ललित प्रभाकरचा मराठी चित्रपट 'आरपार' १२ सप्टेंबरला रिलीज झाला आहे. 'आरपार' चित्रपटात ललित रोमँटिक अंदाजात पाहायला मिळत आहे. तर 'वन टू चा चा चा' हा चित्रपट ३१ ऑक्टोबरला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'वन टू चा चा चा' चित्रपटात बॉलिवूडचे लोकप्रिय कलाकार पाहायला मिळणार आहेत. त्यानंतर ललित प्रभाकर 'प्रेमाची गोष्ट २' या चित्रपटात देखील झळकणार आहे. हा चित्रपट २२ ऑक्टोबर रोजी रिलीज होणार आहे. चाहत्यांना या चित्रपटाची उत्सुकता लागली आहे.

# फाळकेंच्या बायोपिकसाठी आमिर करतोय तयारी




बॉलिवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट आमिर खान कायमच चर्चेत असल्याचं पाहायला मिळतं. कधी नवीन सिनेमामुळे तर कधी त्याच्या पर्सनल आयुष्यामुळे आमिर चर्चेचा विषय बनतो. पण, सध्या आमिरने वेगळ्याच कारणाने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. आमिरचा एक व्हिडीओ समोर आला आहे. यामध्ये मिस्टर परफेक्शनिस्टचं वजन प्रचंड वाढलेलं दिसत आहे. त्याचा लूक पाहून चाहत्यांमध्ये चर्चा रंगली आहे. एका द अकाऊंटवरुन आमिरचा एक व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओत आमिरने सितारे जमीन परच्या टीमसोबत रियुनियन केल्याचं दिसत आहे. या व्हिडीओत तो कलाकारांसह डान्स करताना दिसत आहे. पण, यामध्ये आमिरचा लूक पूर्णपणे बदलल्याचं दिसत आहे. सितारे जमीन परमध्ये आमिरचं वजन एवढं वाढलेलं दिसत नव्हतं. पण, आता मात्र आमिरने नक्की कोणत्या प्रोजेक्टसाठी वजन वाढवलं आहे का? अशी चर्चा होत आहे. यांनी स्वत: या चित्रपटाची कथा व गाण्यांचे गीत लिहिले आहेत. नुकताच या आठवड्यात या चित्रपटाचा मुहूर्त पार पडला. यावेळी अभिनेते राजपाल यादव, गणेश आचार्य, कंगना शर्मा, सुधाकर शर्मा, उदित नारायण, योगेश लखाणी यांसारखी मंडळी उपस्थित होती. वृत्तानुसार प्रसिद्ध गायक उदित नारायण यांनी चित्रपटाच्या मुहूर्तादरम्यान यातील प्रदर्शित न झालेलं एक गाणं गायलं होतं. धर्मेंद्र व अरबाज यांनी त्यांच्या 'मैंने प्यार किया फिर से' या आगामी चित्रपटाबद्दल सांगितलं आहे.' 'मैंने प्यार किया फिर से' या चित्रपटाचं कौतुक करताना धर्मेंद्र म्हणाले, हा खूप उत्कृष्ट चित्रपट आहे, यामधून प्रेक्षकांचं खूप मनोरंजन होणार आहे. रॉनी रॉड्रिज आणि या चित्रपटाच्या संपूर्ण टीमसह माझ्या शुभेच्छा आहेत. पुढे अरबाजबद्दल धर्मेंद्र म्हणाले, मला 'प्यार किया तो डरना क्या' या चित्रपटात त्याच्याबरोबर काम करताना खूप मज्जा आली होती, त्यामुळे मी या आगामी चित्रपटात त्याच्यासह काम करण्यासाठी उत्सुक आहे. यासह अरबाज खाननेही धर्मेंद्र यांच्याबद्दल सांगितलं आहे. अरबाज म्हणाला, धर्मेंद्र यांच्यासह काम कराण्याची पुन्हा एकदा संधी मिळत आहे यासाठी मी स्वत:ला भाग्यशाली समजतो. मी रॉनी रॉड्रिज व आमच्या संपूर्ण टीमला यानिमित्त खूप शुभेच्छा देऊ इच्छितो. दरम्यान, अरबाज खान त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आला आहे.

# अहान शेट्टीला लागली लॉटरी

बॉलीवुड अभिनेता सुनील शेट्टी यांचा मुलगा अहान शेट्टीच्या नवीन चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. हा एक हॉरर चित्रपट असून त्याची कथा प्रसिद्ध चित्रपट निर्माते पॅट्रिक ग्रॅहम लिहिणार आहेत. चित्रपटाचे नाव अद्याप निश्चित झालेले नाही आणि त्याच्या मुख्य अभिनेत्रीचा शोध देखील सुरू आहे. त्याची कथा वेगळी असेल, कारण याद्वारे पॅट्रिक ग्रॅहम हिंदी चित्रपटांमध्ये पुनरागमन करत आहे. यापूर्वी पॅट्रिक ग्रॅहमने 'घोल' आणि 'बेताल' सारख्या हॉरर मालिका बनवल्या होत्या. त्या नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाल्या होत्या आणि दोघांचीही कहाणी खूप गाजली होती. आता हा नवीन चित्रपट रोमँटिक तसेच हॉरर असेल, जो ऐतिहासिक घटनांशी संबंधित असल्याचे म्हटले जाते. हा ख्याती मदनच्या नॉट आउट एंटरटेनमेंटच्या बॅनरखाली बनवला जाईल. अहान शेट्टीबद्दल बोलायचे झाले तर, त्याने २०२१ मध्ये 'तडप' चित्रपटामधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले आहे. हा एक रोमँटिक ॲक्शन थ्रिलर चित्रपट होता. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी कामगिरी करू शकला नाही. सध्या तो 'बॉर्डर-२' च्या शूटिंगमध्ये व्यग्र आहे. अहानच्या आगामी 'बॉर्डर २' चित्रपटाबद्दल बोलायचं झालं तर, हा चित्रपट देशभक्तीवर आधारित आहे. हा चित्रपट २२ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. त्याचे दिग्दर्शक अनुराग सिंग आहेत. 'बॉर्डर २' मध्ये सनी देओल, वरुण धवन, मेधा राणा, मोना सिंग आणि सोनम बाजवा सारखे कलाकार देखील आहेत. भूषण कुमार आणि जेपी दत्ता यांनी त्याची निर्मिती केली आहे.



# इब्राहिमला डेट करतेय पलक?



बॉलिवूडमध्ये अनेक अभिनेत्रींचे लोकप्रिय अभिनेत्यांसोबत अफेअर आहेत, अशा चर्चा रंगत असतात. अभिनेत्री श्वेता तिवारीची मुलगी पलक तिवारीचं अभिनेता इब्राहिम अली खानसोबत अफेअर आहे, अशा चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सोशल मीडियावर रंगल्या आहेत. याबद्दल पलक आणि इब्राहिमने कधीच जाहीर खुलासा केला नाही. परंतु आता या प्रकरणावर पलकची आई अर्थात अभिनेत्री श्वेता तिवारीने मौन सोडलंय.

श्वेता तिवारीने एका मुलाखतीत मुलीच्या डेटिंगच्या चर्चांबद्दल मौन सोडलंय. श्वेता म्हणाली, मला भीती वाटते या बातम्यांबद्दल, कारण ती अजून खूप लहान आहे. लोक कधी तिच्याबद्दल काय वाईट लिहितील, याची मला धास्ती आहे. लोक खूप विचित्र लिहितात. प्रत्येक क्षणी तिचं एका मुलासोबत अफेअर आहे, अशा बातम्या येतात. या सर्व गोष्टी ती किती वेळ सहन करेल? एका क्षणी तिचा उद्रेक होईल, अशी तिची आई म्हणून मला काळजी असते. श्वेता पुढे म्हणाली, तिने तिच्या लव्ह लाईफबद्दल कधी खुलासा केला नाही. जेव्हा अशी एखादी बातमी येते तेव्हा मी अशा कोणत्याही मुलाला डेट करत नाहीये, असं ती प्रांजळपणे कबूल करते. पलकलाच त्या मुलाला विचारावं लागेल की, मी खरंच तुला डेट करत आहे का? ती त्या मुलाला कधी भेटलेली नसते. कधी कधी लोक काही गोष्टी मस्करीत बोलतात. परंतु या गोष्टीचा कधी त्रासही होतो, याची मला जाणीव आहे. अशाप्रकारे श्वेताने मुलगी पलकबद्दल खास खुलासा केलाय.



# शिल्पा शेट्टीने बंद केलं 'बॅस्टियन' रेस्टॉरंट




अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचे कुटुंब कठीण काळातून जात असल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी ६० कोटींच्या फसवणुकीचे आरोप झाले होते. त्यानंतर आता शिल्पाने बॅस्टियन रेस्टॉरंट बंद करत असल्याची घोषणा केली आहे. इन्स्टाग्रामवर ही पोस्ट शेअर करताना अभिनेत्री भावूकही झाली. शिल्पा शेट्टीने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीजवर ही बातमी शेअर करण्यासाठी एक लांबलचक पोस्ट शेअर केली. तिने लिहिले, या गुरुवारी एका युगाचा अंत झाला आहे, कारण आम्ही मुंबईतील सर्वात प्रतिष्ठित ठिकाणांपैकी एक, बॅस्टियन वांद्रेला निरोप देत आहोत. ज्या ठिकाणाने आम्हाला असंख्य आठवणी, अविस्मरणीय रात्री आणि क्षण दिले, ज्याने शहराच्या नाईटलाइफला आकार दिला, आता तो शेवटच्या टप्प्यात आहे. शिल्पाने पुढे लिहिले आहे की, या प्रतिष्ठित जागेचा सन्मान करण्यासाठी आम्ही आमच्या जवळच्या ग्राहकांसाठी एक अतिशय खास संध्याकाळ आयोजित करत आहोत. एक रात्र जी जुन्या आठवणी, ऊर्जा आणि जादूने भरलेली असेल, बॅस्टियन वांद्रेला निरोप देईल, पण गुरुवारी रात्रीची आमची नेहमीची परंपरा आर्केन अफेअर पुढील आठवड्यात बास्टियन ॲट द टॉप येथे सुरू राहील, नवीन अनुभवांसह एका नवीन अध्यायात वारसा पुढे नेईल, असे अभिनेत्रीने लिहिले होते. काही दिवसांपूर्वी शिल्पा शेट्टी आणि तिचे पती राज कुंद्रा यांच्यावर आर्थिक गुन्हे शाखेने मुंबईतील एका व्यावसायिकाला कर्ज आणि गुंतवणूक कराराच्या बहाण्याने ६०.४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात आणखी एक अज्ञात आरोपी आहे. फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल केल्यानंतर काही आठवड्यांनंतर 'बॅस्टियन' बंद होत आहे. तक्रारदार दीपक कोठारी यांनी आरोप केला होता की, या जोडप्याने त्यांची ६० कोटींहून अधिक रुपयांची फसवणूक केली, ज्यामध्ये शेट्टी आणि कुंद्रा यांची आता बंद पडलेली कंपनी, बेस्ट डील टीव्ही प्रायव्हेट लिमिटेड यांचा समावेश होता.

कोठारी यांच्या मते, त्यांनी व्यवसाय वाढवण्याच्या बहाण्याने २०१५ ते २०२३ दरम्यान ही रक्कम गुंतवली होती. परंतु, वैयक्तिक खर्चासाठी या पैशांचा गैरवापर करण्यात आला. एजथ आता या प्रकरणाची चौकशी करत आहे. या तक्रारीनंतर शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्या वकिलांनी आरोप फेटाळून लावले, ते पूर्णपणे निराधार असल्याचे म्हटले.



# केसात गजरा माळला म्हणून नव्या नायरला भरावा लागला दंड

केसात गजरा माळल्याने एका अभिनेत्रीला तब्बल सव्वा लाख रुपयांचा दंड बसला आहे. एअरपोर्टवरील एक महत्वाचा नियम माहित नसल्याने या अभिनेत्रीला इतका मोठा दंड भरावा लागला. ही अभिनेत्री आहे नव्या नायर. नव्याला नुकताच ऑस्ट्रेलियातील सिडनी विमानतळावर हा लाखो रुपयांचा दंड भरावा लागला. याचे कारण होते की तिने आपल्या केसांमध्ये फुलांचा गजरा माळला होता. पण ऑस्ट्रेलियातील एका नियमामुळे तिला सव्वा लाखांचा दंड भरावा लागला. नव्याने स्वतः तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर ही घटना सविस्तर शेअर केली आहे. ती म्हणाली की, सिडनी विमानतळावर पोहोचल्यावर ऑस्ट्रेलियन कस्टम आणि बायोसेक्युरिटी विभागाने तिला तपासणीसाठी थांबवले. अधिकाऱ्यांनी तिच्या केसांमधील गजऱ्याबद्दल विचारपूस केली. गजऱ्यामध्ये नैसर्गिक फुले असल्यामुळे त्यांना देशात आणण्याची परवानगी नाही, असे अधिकाऱ्यांनी तिला स्पष्ट केले. ऑस्ट्रेलियाचे नियम अत्यंत कठोर आहेत. या नियमांनुसार कोणत्याही प्रकारची नैसर्गिक वनस्पती किंवा वस्तू देशात आणण्यास मनाई आहे. संसर्गजन्य रोग किंवा कीटकांचा प्रसार होऊ नये, यासाठी हे नियम करण्यात आले आहेत. नव्याला या नियमांची अजिबात कल्पना नव्हती. या अनपेक्षित चुकीमुळे नव्याला मोठी किंमत चुकवावी लागली. अधिकाऱ्यांनी तिच्यावर १.२५ लाखांचा मोठा दंड ठोठावला. ही रक्कम ऐकून ती पूर्णपणे हादरली. नव्या नायरने तिच्या पोस्टमध्ये लिहिले आहे की, केसांत गजरा घालून ऑस्ट्रेलियात प्रवेश करण्याचा प्रयत्न मला एवढा महागात पडेल, अशी मला कल्पनाही नव्हती. या दंडामुळे माझं मोठं आर्थिक नुकसान झालं. हा प्रसंग नव्यासाठी केवळ एक मोठा धक्काच नव्हे, तर एक महत्त्वाची शिकवणही ठरला. तिने तिच्या सर्व चाहत्यांना आणि परदेशी प्रवास करणाऱ्यांना आवाहन केले आहे की, परदेशात प्रवास करताना त्या देशाच्या नियमांबद्दल सविस्तर माहिती घ्यावी. अशा नियमांकडे दुर्लक्ष केल्याने मोठा दंड भरावा लागू शकतो किंवा प्रवासात अनावश्यक अडथळे येऊ शकतात.



# रश्मिका मंदानाने घातली डायमंड रिंग



रश्मिका मंदाना आणि विजय देवरकोंडा दोघंही लोकप्रिय कलाकार आहेत. रश्मिका आधी साऊथ आणि आता हिंदीतही प्रसिद्ध झाली आहे. विजय देवरकोंडाच्या चार्मिंग लूकवर तरुणाई फिदा आहे. रश्मिका आणि विजयने 'गीता गोविंदम','डिअर कॉम्रेड' या सिनेमांमध्ये एकत्र काम केलं आहे. गीता गोविंदम पासून त्यांच्या रिलेशनशिपलाही सुरुवात झाली अशी नेहमीच चर्चा होते. अद्याप दोघांनीही नातं कबूल केलेलं नाही मात्र आता सर्वांपासून ते लपूनही राहिलेलं नाही. आता नुकतंच रश्मिकाच्या बोटात डायमंड रिंग पाहून विजयसोबत तिची एंगेजमेंट झाली का अशी चर्चा आता सुरु झाली आहे. रश्मिका नुकतीच 'साउथ इंडियन इंटरनॅशनल मूव्ही अवॉर्ड्समध्ये सहभागी झाली होती. दुबईत हा अवॉर्ड सोहळा होता. डिझायनक साडीत ती खूप सुंदर दिसत होती. यानंतर ती एअरपोर्टवर गेली. दोन्ही ठिकाणी तिच्या बोटातील अंगठीने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. नेटकऱ्यांनी तिची एंगेजमेंट झाल्याचा अंदाज लावायला सुरुवात केली. रश्मिकाच्या व्हिडिओवर नेटकऱ्यांनी कमेंट करत 'विजयचाही हात एकदा बघा त्यानेही अंगठी घातलीये का','बधाई हो, फायनली','रश्मिका आणि विजय एंगेज?' अशा कमेंट्स यायला सुरुवात झाली. रश्मिका 'थामा' सिनेमात दिसणार आहे. तर विजयचा नुकताच 'किंगडम' सिनेमात रिलीज झाला. दोघंही करिअरमध्ये यशाच्या शिखरावर आहेत. लग्नाच्या चर्चांवर त्यांनी कायमच मौन पाळलं आहे.

# दुलकर सलमानसोबत जमणार पूजाची जोडी

अभिनेत्री त 'सीता रामम' आणि 'लकी भास्कर' सारख्या तेलुगू चित्रपटांमधून प्रेक्षकांची मने जिंकणारा अभिनेता म्हणजे दुलकर सलमान. मल्याळम सिनेसृष्टीतील प्रसिद्ध नायकांपैकी तो एक आहे. सध्या सर्वत्र दुलकर सलमानच्या आगामी 'DQ41' सिनेमाची तुफान चर्चा आहे. लवकरच तो नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच या चित्रपटासंदर्भात एक महत्वाची अपडेट समोर आली आहे. दुलकर सलमानच्या बहुप्रतिक्षित 'DQ41' चित्रपटात पूजा हेगडेची एन्ट्री झाली आहे. तब्बल तीन वर्षांनंतर पूजा टॉलिवूडमध्ये पुनरागमन करत आहे. या जोडीला रुपेरी पडद्यावर एकत्र पाहण्यासाठी चाहते देखील प्रचंड उत्सुक आहेत. नुकतीच 'SLV Cinemar' द्वारे पूजा हेगडे 'DQ41' चित्रपटाचा भाग असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये पूजा अतिशय साध्या अंदाजात दिसत आहे. मेकर्सनी व्हिडिओसोबत लिहिलंय की, मनमोहक hegdeooja हिचे 'DQ41' मध्ये स्वागत. ऊट आणि पूजेची केमिस्ट्री मोठ्या पडद्यावर जादुई ठरेल. आमच्यासोबत असेच जोडलेले राहा आणि अपडेट्सची वाट पाहा. अशी माहिती त्यांनी सिनेरसिकांना दिली आहे. हा चित्रपट दिग्दर्शक रवी नेलाकुडिटी यांच्या दिग्दर्शनाखाली बनत आहे आणि SLV सिनेमाजद्वारे निर्मित होत आहे. सिनेमात पूजाच्या एन्ट्रीमुळे तिचे चाहते प्रचंड आनंदी झाले आहेत आणि आता प्रेक्षक दुलकर आणि पूजेची ऑन-स्क्रीन केमिस्ट्री पाहण्यासाठी उत्सुक आहेत.'DQ41''हा पूजा हेगडेच्या आगामी चित्रपटांच्या यादीतील एक महत्त्वाच्या प्रोजेक्टपैंकी एक आहे. याशिवाय ती वरुण धवनसोबत है जवानी तो इश्क होना है या चित्रपटातही दिसणार आहे.तसेच ही अभिनेत्री जना नायकन आणि सूर्या ४४ यांसारख्या चित्रपटांमध्ये झळकणार आहे.






# 'दृश्यम ३' कडून थ्रिलरची अपेक्षा ठेवू नका!

'दृश्यम' सस्पेन्स थ्रिलरपट तुफान हिट झाला होता. साउथ सिनेमाचा हा रिमेक होता. यानंतर 'दृश्यम २' आला. तोही असाच सस्पेन्सने भरलेला सिनेमा. तर आता 'दृश्यम ३'ची चर्चा आहे. विशेष म्हणजे साउथ आणि हिंदीत दोन्हीकडे हा सिनेमा एकत्रच शूट होणार आहे. मात्र 'दृश्यम'च्या या तिसऱ्या भागात सस्पेन्सची आशा करु नका असं दिग्दर्शक जीतू जोसेफ म्हणाले. गेल्या काही महिन्यांपासून जीतू जोसेफ 'दृश्यम ३'च्या साउथ सिनेमाच्या प्री प्रोडक्शनचं काम करत आहेत. हा या फ्रँचायझीचा अखेरचा सिनेमा असणार आहे. ५ ड्राफ्टवर काम केल्यानंतर त्यांनी एक स्क्रिप्ट फायनल केली आहे. ऑक्टोबरमध्ये सिनेमाचं शूटिंग सुरु होणार आहे. एका मुलाखतीत ते म्हणाले, मी ॲमस्टरडॅमवरुन दुबईला येत होतो तेव्हा फ्लाईटमध्ये याचा ड्राफ्ट तयार केला होता. लँडिंगआधी मी सीन ऑर्डरही पूर्ण केलं होतं. पण माझ्या मुलींच्या पसंतीस पडलं नाही. म्हणून मी सतत रिराईट करत राहिलो. अशा प्रकारे याची गोष्ट फायनल झाली. ते पुढे म्हणाले, दृश्यम हा सस्पेन्स, थ्रिल आण टाईट स्टोरीलाईन मुळे ओळखला जातो. पण तिसऱ्या भागाकडून प्रेक्षकांनी याची जास्त अपेक्षा ठेवू नये. जर लोकांना वाटत असेल की तिसऱ्या भागात दुसऱ्या पार्टसारखंच भारी भक्कम इंटेलिजेंट गेम असेल तर त्यांची निराशा होईल. काही दिवसांपूर्वीही जीतू जोसेफ यांनी स्पष्ट केलं होतं की ते आता थ्रिलर बनवून थकले आहेत. त्यामुळे आता ते या सिनेमातही थ्रिल आणणार नाहीत. सिनेमाची गोष्ट दुसऱ्या पार्टच्या शेवटापासूनच सुरु होणार आहे.

# अमिरला निर्माता व्हायचचं नव्हत!

अमिर खान बॉलीवूडमधील अष्टपैलू अभिनेत्यांपैकी एक समजला जातो. अभिनयासह तो एक निर्माता व दिग्दर्शकही आहे. आजवर त्याने अनेक चित्रपटांची निर्मिती केली आहे. त्यातीलच एक म्हणजे आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित 'लगान' हा चित्रपट. परंतु, या चित्रपटाच्या निर्मितीआधी त्याला वडिलांनी मोलाचा सल्ला दिलेला. त्याबद्दल त्याने सांगितले आहे. आमिर खानचे वडील दिग्दर्शक व निर्माते होते. त्यामुळे आमिरला तो वडिलांप्रमाणे निर्मिती क्षेत्रात कधी पाऊल ठेवणार याबद्दल अनेकदा विचारले जायचे; पण त्याला मात्र याबद्दल भीती वाटायची, असे त्याने सांगितले आहे. आमिरने एका मुलाखतीत याबद्दल सांगितलं आहे. आमिर म्हणाला, मी माझ्या वडिलांची कारकिर्द पाहिल्यानंतर मला जाणवलं की मला कधीच निर्माता व्हायचं नाहीये. निर्मात्याला सगळ्यात जास्त काम करावं लागतं. तुम्हाला सगळे धोके पत्करावे लागतात आणि तरीसुद्धा तुम्हालाच लोकांकडून सगळ्यात जास्त ऐकावं लागतं. अनेकदा टीम तुम्हाला नीट सहकार्य करीत नाही आणि त्यामुळे माझ्या वडिलांना त्यांचा 'लॉकेट' चित्रपट बनवण्यासाठी आठ वर्षं लागली. ते सगळं पाहिल्यानंतर मी ठरवलं की, आता मी अभिनेता बनायचं. अनेकदा मला तू तुझ्या वडिलांच्या पाऊलावर पाऊल कधी ठेवणार आहेस वगैरे विचारलं जायचं. तेव्हा मी म्हणायचो की, कधीच नाही. मी दिग्दर्शक होईन आणि आता अभिनेताही आहे. पण, मी कधीच निर्माता होणार नाही. मात्र, जेव्हा मी 'लगान' या चित्रपटाची कथा वाचली तेव्हा मला ती खूप आवडली; पण मी विचार करीत होतो की, कोण याची निर्मिती करील. मी 'लगान'च्या नरेशनला रीनाला आणि माझ्या आई-वडिलांना आमंत्रित केलेलं. त्यावेळी आशुतोष गोवारीकर चित्रपटाचं नरेशन करीत होते. मी रीनाला विचारलं, तर ती म्हणाली, खूप चांगली कथा आहे. आई-वडिलही तेच म्हणाले. मी माझ्या वडिलांना विचारलं. हे शक्य आहे की, खूपच वेगळं वाटतंय. तर ते म्हणाले की, चांगली कथा सहज मिळत नाही. त्यामुळे जेव्हा अशी चांगली कथा तुमच्याकडे येते तेव्हा जास्त विचार नाही करायचा. आमिरने त्यानंतर 'लगान' चित्रपटाची निर्मिती केली आणि वडिलांप्रमाणे निर्मिती क्षेत्रात पाऊल टाकले.





# बॉर्डर २ सिनेमात नवी अभिनेत्री

दिलजीत दोसांझ, वरुण धवन आणि अहान शेट्टी स्टारर 'बॉर्डर २' हा चित्रपट सध्या खूप चर्चेत आहे. या चित्रपटाने आधीच बरीच प्रसिद्धी मिळवली आहे. चित्रपटाच्या स्टारकास्टमध्ये एक नवीन नाव जोडले गेले आहे. यामुळे चित्रपट अधिक चर्चेत आला आहे. आता या चित्रपटात सोनम बाजवाचे नाव जोडले गेले आहे. तिने यापूर्वी दिलजीत दोसांझसोबत काम केले आहे. सोनम बाजवा पुन्हा एकदा दिलजीत दोसांझसोबत बहुप्रतिक्षित ड्रामा चित्रपट 'बॉर्डर २' मध्ये काम करणार आहे. सोनम बाजवा आणि दिलजीत दोसांझ यांनी 'पंजाब १९८४', कॉमेडी चित्रपट 'सरदारजी २', ॲक्शनने भरलेला चित्रपट 'सुपर सिंग' आणि कौटुंबिक मनोरंजनात्मक चित्रपट 'हौसला राख' मध्ये एकत्र काम केले आहे. 'बॉर्डर २' या चित्रपटात दिलजीत दोसांझ आणि सोनम बाजवा यांच्याशिवाय सनी देओल, वरुण धवन, मेधा राणा आणि मोना सिंगसारखे दमदार कलाकारही दिसतील. सनी देओलने बोलताना या चित्रपटाबद्दल सांगितले की, 'आपल्याला कधीच कोणत्याही गोष्टीची खात्री नसते. फक्त आव्हानासह काहीतरी करण्याचा उत्साह नेहमीच मनोरंजक असतो. जर एखाद्या व्यक्तीने सुरुवात करण्यापूर्वी विचार केला तर तो काम करू शकणार नाही. सुरुवातीला चर्चा होत राहतात, नंतर आपल्याला प्रवाहाबरोबर जावे लागते.' 'बॉर्डर २' हा चित्रपट जेपी दत्ताच्या १९९७ च्या क्लासिक चित्रपट 'बॉर्डर' चा सिक्वेल आहे. चित्रपटात भारत आणि पाकिस्तानमधील युद्ध पुन्हा एकदा दाखवले जाईल. या चित्रपटाचे निर्माते भूषण कुमार, कृष्ण कुमार, जेपी दत्ता आणि निधी दत्ता आहेत. 'बॉर्डर २' चे दिग्दर्शन अनुराग सिंग करत आहेत.



# एकाच सिनेमात 'हे' सात कलाकार झळकणार

हिंदीमधल्या मल्टीस्टारर चित्रपटांना टक्कर देईल असा बिग बजेट, अप्रतिम कथानक असलेला आणि एकापेक्षा एक दमदार कलाकारांना एकत्र घेऊन एक नवा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सिड विंचूरकर या सिनेमाचं दिग्दर्शन करत आहेत. यामध्ये सात लोकप्रिय कलाकार एकत्र झळकणार आहेत. हा सिनेमा नेमका कसा असेल, याचं नाव काय आहे जाणून घेऊया... मराठी चित्रपटसृष्टीत नुकतीच 'थप्पा' या एका भव्य आणि हटके मल्टीस्टारर चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. 'थप्पा'चं सिनेमाचं सर्वात मोठं वैशिष्ट्य आहे ती म्हणजे त्याची ड्रीम स्टारकास्ट. चित्रपटाचं कथानक नेमकं काय आहे? यामधून मैत्री, प्रेमकथा, फसवणूक, सूड किंवा काहीतरी वेगळं रहस्य उलगडणार, हे अजून गुलदस्त्यातच आहे. 'थप्पा'मध्ये नेमकं काय पाहायला मिळणार हे जाणून घेण्यासाठी सर्वांना थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे. वैदेही परशुरामी, रिंकू राजगुरू, सिद्धार्थ बोडके, गौरव मोरे, सखी गोखले आणि साईंकित कामत हे लोकप्रिय आणि दमदार कलाकार या सिनेमाच्या निमित्ताने एकत्र पडद्यावर झळकणार आहेत. याशिवाय फोटोत एका प्रसिद्ध सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरची झलक प्रेक्षकांना पाहायला मिळत आहे. हा इन्फ्लुएन्सर आहे डॅनी पंडित. तो सुद्धा या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिका साकारताना दिसेल. या सर्व कलाकारांनी पहिल्यांदाच एकत्र स्क्रीन शेअर केली असून इतकी मोठी स्टारकास्ट एकत्र पाहण्याची संधी या निमित्ताने प्रेक्षकांना मिळणार आहे. नवे चेहरे, नवे जोडीदार असल्याने यात नवीन केमिस्ट्री पाहायला मिळेल, त्यामुळे हा अनुभव खर्या अर्थाने वेगळा आणि थरारक ठरणार आहे. दिग्दर्शक सिड विंचूरकर म्हणतात, सध्या तरी अनेक गोष्टी गोपनीय असून ताकदीच्या स्टारकास्टमुळे हा सिनेमा प्रेक्षकांवर भव्य ठसा उमटवेल, याची खात्री आहे. चित्रीकरण लवकरच सुरू होणार असून संपूर्ण टीम अत्यंत उत्साही आहे. प्रेक्षकांसाठी काहीतरी नवीन आणि प्रभावी घेऊन येत आहोत.

# 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' लवकरच होणार प्रदर्शित


रूपेरी पडद्यावर २००७ साली 'साडे माडे तीन' चित्रपटाच्या माध्यमातून रतन, मदन आणि चंदन या कुरळे ब्रदर्सच्या तिकडीने सगळ्यांचीच मने जिंकली होती. हा चित्रपट आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहे. या चित्रपटाचा दुसरा भाग अंकुश चौधरी दिग्दर्शित 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' १४ नोव्हेंबरपासून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' चित्रपटाच्या झळकलेल्या नवीन फलकावर ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, भरत जाधव, मकरंद अनासपुरे हे कुरळे ब्रदर्स त्यांच्या नेहमीच्या अवखळ अंदाजात दिसत आहेत. त्यांच्यासोबत सिद्धार्थ जाधवही आहे. या सगळ्यांच्या चेहऱ्यावरचे खट्याळ भाव आणि भन्नाट लूक पाहून पुन्हा एकदा हास्याचा महापूर येणार असल्याचे आपसूकच जाणवते. तर या धमाल चौकडीत अभिनेत्री रिंकू राजगुरूही पाहायला मिळणार आहे. या चित्रपटाचे उषा काकडे, पुष्कर यावलकर, सुधीर कोलते, स्वाती खोपकर आणि निनाद नंदकुमार बत्तीन निर्माते आहेत. अंकुश चौधरी यांची कथा, संदीप दंडवते यांची पटकथा आणि संवाद लाभलेल्या या चित्रपटात ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, भरत जाधव, मकरंद अनासपुरे, सिद्धार्थ जाधव, रिंकू राजगुरू, संकेत पाठक, संजय नार्वेकर, समृद्धी केळकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या १४ नोव्हेंबर रोजी 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. 'पहिल्या भागामुळे प्रेक्षकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. त्यामुळे यावेळची जबाबदारी जास्त मोठी होती. चित्रपट एक कौटुंबिक मनोरंजनाचे परिपूर्ण पॅकेज आहे', असे दिग्दर्शक अंकुश चौधरी यांनी सांगितले.




# महेश मांजरेकरांचा 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' लांबणीवर



मराठीसह हिंदी सिनेविश्वात आपल्या सिनेमांनी प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन करणारे प्रसिद्ध दिग्दर्शक, निर्माते आणि अभिनेते म्हणजे महेश मांजरेकर. काही दिवसांपूर्वी महेश मांजरेकर यांनी महाराष्ट्रातील सिनेरसिकांना खास भेट दिली होती, ती म्हणजे त्यांच्या आगामी 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या सिनेमाची. महाराष्ट्र दिनी 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली. यानंतर सिनेमाचा खास टीझर प्रेक्षकांसमोर आणला होता. सिनेमाची घोषणा झाल्यापासूनच चाहत्यांना 'पुन्हा शिवाजीराजे भोसले' या सिनेमाची उत्सुकता लागून राहिली होती. येत्या दिवाळीत हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार होता, मात्र आता या सिनेमाबाबत एक अपडेट समोर येत आहे. ती म्हणजे हा सिनेमा दिवाळीत प्रदर्शित न होता पुढे काही महीने लांबणीवर गेला आहे. वृत्तानुसार, महेश मांजरेकरांचा 'पुन्हा शिवाजी राजे भोसले' हा बहुप्रतिक्षित मराठी चित्रपट येत्या दिवाळी २०२५ मध्ये प्रदर्शित न होता पुढे ढकलण्यात आला आहे. त्यामुळे दिवाळी ऐवजी हा सिनेमा आता पुढील वर्षी म्हणजेच १ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. याबाबतचं अधिकृत कारण अद्याप समोर आलेलं नाही. 'पुन्हा शिवाजी राजे भोसले'बाबत सांगायचं झाल्यास, यात अभिनेता सिद्धार्थ बोडके, सयाजी शिंदे, त्रिशा ठोसर, भार्गव जगताप, विक्रम गायकवाड, मंगेश देसाई, शशांक शेंडे, संदीप जुवाटकर आणि इतर अनेक कलाकार महत्त्वाच्या भूमिका साकारत आहेत. 'पुन्हा शिवाजी राजे भोसले' या चित्रपटाचं लेखन आणि दिग्दर्शन महेश वामन मांजरेकर यांनी केलं असून, निर्मितीची धुरा राहुल पुराणिक आणि राहुल सुगंध यांनी सांभाळली आहे. तर संगीत व पार्श्वसंगीताची जबाबदारी हितेश मोडककडे आहे. दरम्यान, 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय' नंतर प्रेक्षकांना 'पुन्हा शिवाजी राजे भोसले' या सिक्वेलकडून खूप अपेक्षा आहेत. आजच्या काळात मराठी अस्मितेवर नव्याने भाष्य करणारा हा चित्रपट आता २०२६ मध्ये प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.



# इये मराठीचिये नगरी: आशा भोसले

**'ऐकशील का रे माझे, अर्थहीन गीत। दूर दूर जाते धरूनी उरी तुझी प्रीत।।' १९५२ सालच्या 'लाखाची गोष्ट' या मराठी चित्रपटात ग. दि. माडगूळकर यांचे शब्द स्वरांच्या मधात घोळून आशा भोसले यांनी त्यातील भाव जिवंत केले. धृपदातील चालीची नजाकत हृदयाची स्पंदने थांबवितात. अंतऱ्यातील स्वरांची किमया चित्तवृत्तींना जागृत करते. उरात प्रीती साठवून निघून जाण्यातील कळवळा कळतो. स्वरोच्चारात आणलेली खुमारी अवर्णनीय आहे.**



**'डोळ्यात वाच माझ्या तू गीत भावनांचे। सादा विना कळाले संगीत लोचनांचे।।'** डोळ्यात अहोरात्र फिरणारी दोन पाखरे प्रसंगानुसार भाव प्रेरित करीत असतात. कुठल्याही नादाशिवाय हे मूकसंगीत सर्वकाही विषद करते. सुधीर फडकेंच्या धृपदातील शब्दांना आशाताई उत्तरतात...**'मी वाचले मनीचे। फुलवी मनात आशा सांगावया तुला ते। नाही जगात भाषा हितगुज प्रेमिकांचे। हे बोल त्या मुक्यांचे... डोळ्यात...।।'** नेत्रपल्लवांनी उजागर केलेल्या संकेताने माझ्याही मनी आशा पल्लवित झाल्या. व्यक्त करण्यास शब्द नाही, नेत्राद्वारे प्रेमाचे हितगुज हीच मुक्या मनाची भाषा. सौंदर्याने नटलेल्या शब्दप्रभू 'गदिमां'च्या शब्दांचे तेवढ्याच ताकदीने गायलेले गाणे ऐकतानाच्या क्षणांचे सदैव ऋणी राहावे. 'ही कुणी छेडिली तार। प्राजक्ताच्या मधुगंधासम। कुठूनी ये केदार?' पु. ल. देशपांडे यांच्या १९५३ सालच्या 'गुळाचा गणपती' चित्रपटातील हे युगल गीत आशाताई व वसंतराव देशपांडे यांच्या स्वरांच्या गुंफणीत विणलेले आजही तितकेच ताजे व टवटवीत वाटते. धृपदाची सुरुवात आशाताईंच्या सुरावटीने होते. इथे तर प्रेमाचा केदारच मुळी केदार रागात आळविला आहे.

आशाताईंच्या जादुई स्वरांची मोहिनी १९५० च्या आधीपासून पडू लागली होती. 'एका तळ्यात होती बदके पिले सुरेख.' 'गोरी गोरी पान फुलासारखी छान' ही अप्रतिम गाणी माहिति नाही असा मराठीदर्शक विरळाच! ग. दि. माडगूळकरांनी या रचना खऱ्या तर १९४९-५० च्या दरम्यान 'लक्ष्मीची पावलं' या चित्रपटासाठी रचल्या होत्या. श्रीनिवास खळे हे तेव्हा नवोदित संगीतकार होते. गदिमा नाराज झाले. परंतु खळे यांनी दोन्ही गाणी आशाताईंकडून रेकॉर्ड करून त्यांना ऐकवली तेव्हा त्यांनी खूश होत खळे यांची स्तुती केली.

दुर्दैवाने हा चित्रपट निघालाच नाही. माडगूळकरांनी स्वतः प्रयत्न करून एच.एम.व्ही. कडून त्या रचना रेकॉर्ड करून घेतल्या. अशारीतीने सिनेमासाठी तयार केलेली ही गाणी, भावगीते म्हणून मराठी रसिकांच्या घराघरात पोहोचली. गीतकाराच्या शब्दापलीकडे व संगीतकाराच्या संगीतापलीकडे जाणारा आशाताईंचा आवाज ऐकल्यावर कुणीही निःशब्द होतो. कारण तुऱ्यावस्थेत शब्द फुटत नाही. जुन्या पिढीतील स्वरभास्कर पं. दीनानाथ मंगेशकर यांच्या पदरी आशा हा मुक्तकोटीचा आत्मा ८ सप्टेंबर १९३३ रोजी सांगली मुक्कामी अवतरला. घरात संगीताचे वातावरण. दीनानाथांनी आपल्या गळ्यातील गांधार लता यांच्या गळ्यात सामावला व स्वतःच्या गळ्यातील तडफदार स्वर व पहाडी ठेक्याचा वारसा आशाताईंना दिला. १९४३ साली 'माझे बाळ' या मराठी चित्रपटात त्या सर्वप्रथम गायल्या दत्ता डावजेकर यांच्या संगीतात. गाणे होते 'चला चला नव बाळा...'

वयाच्या १६ व्या वर्षी घरच्यांच्या विरोधात जाऊन १५ वर्षांनी मोठे असलेले गणपतराव भोसलेंशी विवाह केला व आशा मंगेशकरच्या 'आशा भोसले' झाल्या. या दाम्पत्याला हेमंत, आनंद व वर्षा ही अपत्ये झालीत. भोसले यांचे निधन १९६६ साली झाले. आशा भोसले यांनी दुसरा विवाह हिंदीतील प्रसिद्ध संगीतकार आर. डी. बर्मन यांच्याशी १९८० साली केला. बर्मन यांचे निधन १९९४ साली झाले. आशा यांच्या आयुष्यात एक न्यूनगंड नेहमीकरिता आहे. 'या जन्मी दुय्यम स्थानावर समाधान!' लतानंतर आशा याच दृष्टिकोनाचे समर्थन करते. **'झुक झुक झुक झुक आगीन गाडी। धुरांच्या रेषा हवेत काढी।' 'तू सुखी रहा'** चित्रपटातील बालपणीच्या स्मृती चाळवणारे हे गीत रक्ताच्या नात्यातील ओढीतील शाश्वत आनंद प्रकट करतात. बालसुलभ पवित्र्यात आशाताईंनी गायलेले खोडकर व चंचल स्वरातल्या या गाण्याने खूप लोकप्रियता मिळविली होती.

'बुगडी माझी सांडली ग। जाता सातार्याला ग जाता साताऱ्याला आशा भोसले यांनी 'सांगते ऐका' चित्रपटात गायलेली व पडद्यावर जयश्री गडकरने सादर केलेली ही 'बुगडी' अजरामर झाली. शब्दात व चालीत अनोखे रंग व ठसका भरण्याचे कसब त्यांच्यात आहे. 'आज कुणीतरी यावे' (मुंबईचा जावई) चित्रपटातील सुधीर फडके यांची मल्हार रागातील सुरांची धून गदिमांच्या शब्दांना कुरवाळीत आशाताईंनी मेघमल्हारचे सूर मुक्तपणे कोसळणाऱ्या पर्जन्यसरींची खुमारी वाढवीत तानसेनी गायकी सिद्ध केली. 'दिवसामागुनी दिवस चालले। ऋतु मागुनी ऋतु' (सुवासिनी) चित्रपटात आशाच्या स्वरांनी फुलविलेली विरही प्रीत मनात गलबल निर्माण करते. प्रत्येक कडव्याच्या शेवटी सेतू, केतू, ओतू या शब्दांवर स्वरांचे वजन ठेवून गायले आहे.

अनेक पुरस्कारांच्या त्या मानकरी ठरल्या आहेत. २००७- ग्रॅमी अवॉर्ड. हा अवॉर्ड मिळणाऱ्या त्या पहिल्या भारतीय आहेत. २०००- दादासाहेब फाळके पुरस्कार. २००१- जीवन गौरव पुरस्कार. २००८- पद्मभूषण पुरस्कार. सर्वोत्कृष्ट गायिका म्हणून आठ वेळा फिल्म फेअर पुरस्कार. महाराष्ट्र सरकारकडून १५ पेक्षा जास्त पुरस्कार. आशा भोसले यांनी सर्व भाषांतील मिळून १२ हजारांच्या वर गाणी गायली असून मराठीतही हजारो गाण्यांचे त्यांचे योगदान आहे. अथांग सागरातील स्वररूपी जल, ओंजळीत घेऊन सागरालाच अर्पण करण्याचा हा क्षीण प्रयत्न. वयाच्या व काळाच्या ओघाला थोपवून धरीत त्या आजही गात आहेत. ८ सप्टेंबर २०२५ रोजी वयाची ९२ वर्षे त्या पूर्ण करीत आहेत. ज्येष्ठ कवयित्री अमृता प्रीतम यांनी म्हटल्याप्रमाणे 'अंबर की एक पाक सुराई' हे शीर्षक त्यांनी सार्थ केले आहे. आशा भोसले या गानरत्नाला 'भारत रत्न' हा पुरस्कार तसेच उदंड आयुष्य प्राप्त होवो, हीच ईश्वराकडे प्रार्थना करताना त्यांनी पंडितराव नगरकरांसोबत गायलेली अमर आळवणी आठवते... 'सांगा मुकुंद कुणी हा पाहिला...

**रमेश पोफळी**

# मी कोणाचं करिअर संपवलं?



सध्या 'बिग बॉस १९'ची चर्चा सुरू आहे. नुकतंच या पर्वाचा दुसरा 'वीकेंड का वार' पार पडला. यादरम्यान 'बिग बॉस'च्या मंचावर सलमान खानने लोक त्याच्याबद्दल तो इतरांचे करिअर संपवतो असं खूप काही बोलत असतात, याबद्दल प्रतिक्रिया दिली आहे. 'बिग बॉस १९'च्या मंचावर 'वीकेंड का वार'दरम्यान 'बिग बॉस'च्या घरात अभिनेत्री शहनाज गिलचा भाऊ शहबाझ बदेशाची वाईल्ड कार्ड स्पर्धक म्हणून एन्ट्री झाली आहे. अशातच त्याला पाठिंबा देण्यासाठी त्याची बहीण व 'बिग बॉस' सीझन १३ची स्पर्धक शहनाज गिल उपस्थित होती. त्यावेळी तिने सलमानला सर त्याला (शहबाझ) काही काम असेल तर द्या.

गेल्या सात वर्षांपासून त्याचं या शोमध्ये येण्याचं स्वप्न होतं, असं सांगितलेलं. यावेळी ती सलमानला तो लोकांचं करिअर घडवतो असंही म्हणाली. शहनाजला प्रतिक्रिया देत सलमानने सांगितलं की, तो कोणाचंही करिअर घडवण्यासाठी किंवा संपवण्यासाठी जबाबदार नाहीये. सलमान पुढे म्हणाला, लोक म्हणतात की किती लोकांना डुबवलं, महत्त्वाचं म्हणजे डुबवणं तर माझ्या हातातच नाही. पण, हल्ली असं खूप म्हटलं जातं की करिअर संपवलं, मी कोणाचं करिअर संपवलं? जर संपवायचंच असेल तर मी माझं करिअर संपवेन. सलमान पुढे म्हणाला, करिअर घडवणं देवाच्या हातात असतं लोकांनी माझ्यावर मी इतरांचे करिअर संपवले असे आरोप केले. एकवेळ मी माझं करिअर संपवेन. लोक खूप चांगले आहेत आणि देव त्यांच्याहूनही जास्त चांगला आहे.



## स्वतःला सांभाळणं कठीण, मग मूल कशाला?

बॉलिवूड अभिनेता अभय देओल नेहमी आपल्या स्पष्ट मतांसाठी चर्चेत राहतो. अलीकडेच त्यांनी एका पॉडकास्टदरम्यान लग्न आणि मुलं या विषयावर आपली भूमिका स्पष्ट केली. अभय म्हणाला, त्याला मूल नकोय. त्याने सांगितलं, जर मला घर बसवायचे असेल तर मी मूल जन्माला घालण्याऐवजी दत्तक घेणे पसंत करेन. कारण मी जगाकडे पाहतो आणि विचार करतो की या आधीच वाढलेल्या लोकसंख्येमध्ये अजून भर का घालावी? या पृथ्वीवर आधीच खूप बोझ आहे. त्यात अजून वाढ करू नये, म्हणून मला मूल नको आहे. त्याने पुढे सांगितलं की, मला माहीत नाही मी कसा पिता ठरेन. मी स्वतःच्या भावनांना किती सांभाळू शकेन? कदाचित मी खूपच कंट्रोल करणारा किंवा अधिकार गाजवणारा बाप होऊ शकतो. आज मी जितका शांत आहे, तेवढा राहणार नाही. सतत ताण घेणारा, जास्त सुरक्षात्मक होऊ शकतो. म्हणूनच मला वाटतं की मूल न घेणंच योग्य आहे. अभयने मान्य केलं की त्यांच्यात काळजी घेण्याची भावना कुटुंबातून आली आहे. पण, स्वतःला सांभाळणं जसं कठीण आहे, तसं मूल वाढवणं माझ्यासाठी खूप अवघड होईल, असं तो म्हणाला. कामाबद्दल बोलायचं झालं तर अभय या वर्षी प्रदर्शित झालेल्या 'बन टिक्की' या चित्रपटात दिसला होता. या चित्रपटात त्यांच्यासोबत शबाना आझमी आणि नुसरत भरुचा प्रमुख भूमिकेत झळकल्या होत्या.

## 'लव्ह अँड वॉर'मध्ये 'ते' दोघे एकत्र!

रणबीर कपूर आणि आलिया भट आगामी 'लव्ह अँड वॉर' सिनेमात दिसणार आहेत. विकी कौशलही या सिनेमात मुख्य भूमिकेत आहे. संजय लीला भन्साळी यांचा हा महत्वाकांक्षी प्रोजेक्ट आहे. हे तिघंही या सिनेमात एकत्र येत असल्याने चाहते खूप उत्सुक आहेत. रणबीर आणि आलिया चिमिकल्या राहाचे पालक आहेत. एकाच सिनेमात काम करत असल्याने लेकीला वेळ देणं कठीण होतं का? असा प्रश्न आलियाला विचारण्यात आला होता. त्यावर तिने प्रतिक्रिया दिली आहे. दोघंही एकाच सिनेमात काम करत असल्याने शूटिंगच्या वेळा सांभाळून राहाला कसा वेळ देता? एका मुलाखतीत आलिया म्हणाली, ऐकायला बाळबोध वाटेल पण याचा काहीच तोटा जाणवला नाही उलट फायदाच झाला. आम्ही सिनेमाचं बरंचसं शूटिंग रात्रीच केलं. त्यामुळे दिवसा आम्ही राहाबरोबरच असायचो. काही दिवस रणबीरचं शूट असायचं काही दिवस माझं. आम्ही नेहमीच एकत्र सेटवर नव्हतो. ती पुढे म्हणाली, राहा काही वेळेला आमच्यासोबत सेटवरही आली आहे आणि तिने मस्त एन्जॉय केलं आहे. तसंच राहा स्वतः आता तिचे क्लासेस, प्लेडेटमध्ये व्यग्र असते. आजी आजोबांसोबत वेळ घालवत असते. आमच्या अनुपस्थितीत राहाचा सांभाळ करणारे इतके लोक आहेत त्याबद्दल खरंच मी खूप ऋणी आहे. 'लव्ह अँड वॉर' शिवाय आलिया 'अल्फा' या यशराज फिल्म्सच्या स्पाय युनिव्हर्स सिनेमात दिसणार आहे. यामध्ये ती कधीही न दिसलेल्या अशा दमदार ॲक्शन भूमिकेत आहे.





## काजोल येणार राजकारणात?

अभिनेत्री काजोल लवकरच 'द ट्रायल' या वेब सीरिजच्या दुसऱ्या सीझनमधून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अमेरिकन वेब सीरिज 'द गुड वाईफ'चा रिमेक असलेल्या 'द ट्रायल'च्या पहिल्या सीझनला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता. आता त्याचा पुढचा भाग 'द ट्रायल सीझन २: प्यार कानून धोखा' १९ सप्टेंबर रोजी जिओ हॉटस्टारवर प्रदर्शित होणार आहे. नुकत्याच झालेल्या एका मुलाखतीत काजोलने तिच्या भूमिकेबद्दल आणि राजकारणाबद्दल काही महत्त्वाचे खुलासे केले. शोमध्ये काजोलने साकारलेली 'नोयोनिका' ही राजकारणापासून दूर राहू इच्छिते. याच संदर्भात जेव्हा तिला राजकारणात येण्याची संधी मिळाल्यास काय करशील, असा प्रश्न विचारला, तेव्हा तिने स्पष्टपणे सांगितले, मला राजकारण समजत नाही. मी स्वप्नातही राजकारणात येऊ शकत नाही. मला जे समजत नाही त्यात मी कधीच पडणार नाही. 'द ट्रायल सीझन २' बद्दल बोलताना काजोल म्हणाली, ही फक्त एक मालिका नाही, तर एक सामाजिक उपक्रम आहे. समाजातील अशा अनेक कथा या शोमधून समोर येतात, ज्याकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते. अशा कथेचा भाग होणे ही माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. 'द ट्रायल'मध्ये काजोलने वकील नोयोनिका आणि जिशु सेनगुप्ताने तिचा पती राजीव सेनगुप्ता यांची भूमिका साकारली आहे. या शोमध्ये दोघांचीही दमदार केमिस्ट्री पाहायला मिळाली. 'द ट्रायल सीझन २' मधून काजोल पुन्हा एकदा तिच्या भूमिकेने प्रेक्षकांची मनं जिंकेल अशी अपेक्षा आहे.